P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक - २२/१०/२०२३

**दि.२१/१०/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**<u>भाग १ ते ५ चे गुन्हे</u>**

०१.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ६८९/२०२३ भा.दं.वि. कलम ३९४ व आर्म अॅक्ट ४(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ चे कलम-३७(१) सह-१३५ प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१९/१०/२०२३ रोजी रात्रौ ११/०० वाजताचे सुमारास स्पाईन रोड, संविधान चौकातील पाण्याच्या टाकीच्या गेटजवळ, चिखली, पुणे.

गुन्हा दाखल :- दि.२१/१०/२०२३ रोजी ०३/२३ वाजता

फिर्यादी :- जुम्मन किताबुल्ला शाहा, वय ४१ वर्षे, धंदा. मजुरी काम, रा. पार्वती डेकोरेर्ट या मंडप साहित्याच्या गोडावुनमध्ये, कृष्णानगर, चिंचवड, पुणे.

आरोपी :- सुमारे १४ ते १५ वयोगटातील व सडपातळ बांध्याचे तीन इनोळखी मुले
**आरोपी निष्पन्न—** १.आदिल बालाजी गवळी वय १९ वर्ष रा.शिवमुद्रा बिल्डीग घरकुल चिखली पुणे.
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद केले तारखेस, वेळी व ठिकाणी फिर्यादी हे एकटेच पायी चालत कृष्णानगर भाजी मंडई चौकामध्ये जेवण करण्यासाठी म्हणुन गेले असता तेथील मेस बंद झाली होती त्यामुळे यांनी जेवण न करता परत त्यांच्या रुमकडे येत असताना सुमारे १४ ते १५ वयोगटातील विधीसंघर्षीत अनोळखी बालक समोरुन पायी चालत फिर्यादी यांच्याजवळ आले व त्यांचेपैकी एका मुलाने फिर्यादी यांची गचांडी धरुन "तेरा मोबाईल और पैसा सब निकाल" असे म्हणु लागला व दुस-या मुलाने जबरदस्तीने फिर्यादी यांच्या पँटीच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्यामध्ये हात घालुन त्यांचा मोबाईल घेण्याचा प्रयत्न करत होता तेव्हा फिर्यादी यांनी त्याचा हात धरुन त्यास विरोध केला असता तो फिर्यादी यांना लाथा-बुक्यांनी मारहाण करु लागला तसेच इतर दोन मुलांनी त्यांच्या खिश्यातुन चाकु सारखे हत्यार काढुन दोघांनी फियादी यांच्या पोटावर, छातीवर, वार करुन फिर्यादीस जखमी केले तेव्हा फिर्यादी खाली पडले असता फिर्यादीस लाथा-बुक्यांनी मारहाण करणा-या मुलाने रस्त्यावर पडलेला एक दगड उचलुन फिर्यादीच्या डोक्यात मारला व त्याने फिर्यादीच्या पँटीच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यामध्ये हात घालुन फिर्यादी यांचे १५००/- रुपये रोख रक्कम जबरदस्तीने जबरी चोरी करुन काढुन घेवुन पळुन गेले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- एस. टी. म्हस्के, सहा. पोलीस निरीक्षक, ७७७४८२२०२६

०२.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण ८५७/२०२३ भादवि कलम ३८४, ३८६, ३८७, प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. १६/१०/२०२३ रोजी २२:०० वा ते दि.२१/१०/२०२३ रोजी १३:०० वा पर्यत फिर्यादीचे रहाते घरी मेदनकरवाडी, चाकण, पुणे

गुन्हा दाखल :- दि. २१/१०/२०२३ रोजी २१/३४ वा

फिर्यादी :- दर्शन रविंद्र मेदनकर वय-२१ वर्षे धंदा- शिक्षण रा. घर नं. १७८, वेद हाईट सोसायटी जवळ, मेदनकरवाडी, चाकण, पुणे

आरोपी :- मोबाईल नंबर ८९७५७०७२५४ हा वापरणाया मोबाईल धारक
**आरोपी निष्पन्न—** मिथुन सोपान मुंगसे, वय ३६ वर्षे , रा. आरपीएस टॉउनशिप फलॅट नं २०९ मेदनकरवाडी चाकण पुणे **आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे रहाते घरी मेदनकरवाडी, चाकण, पुणे येथे असतांना मो.नं. ८९७५७०७२५४ यावरुन फिर्यादी यांचे मोबाईल नं. ९५७९५५६५५४ यावर मॅसेज करुन, पेनड्राईव्हचे काय करायचे असे म्हणून त्यातील फिर्यादीचे पर्सनल व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देवुन, ०५ लाख रुपयांची खंडणी मागुन, फिर्यादी यांनी ती देण्यास नकार दिला असता, फिर्यादीस संपवुन टाकण्याची व व्हिडीओ व्हायरल करुन बदनामी करण्याची धमकी देवुन, अरविंद वामन सोनवणे व अजय अशोक सावंत यांचे क्युआर कोडवर १४,०००/- रुपये जबरदस्तीने पाठविण्यास भाग पाडले. तसेच आणखीन पैशाची मागणी करीत आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पो उप नि मोरखंडे ९९२१११८१००

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड १०३८/२३भा.द.वि.कलम ३२६,३२४,३२३,१४३,१४७,१४८,१४९,५०६ आर्म ॲक्ट ४(२५) म पो का कलम ३७(१) सह १३५, महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष,अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालणेबाबत व त्यांचे समुळ उच्चटन करण्याबाबत अधिनियम २०१३ चे कलम ३ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. २०/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/३० वा पासुन ते ०१/०० वा चे दरम्यान सी/ ओ म्हेत्रे यांची रुम, विर हॉस्पीटल शेजारी, तापकिर चौक, काळेवाडी, पुणे येथे फिर्यादीचे राहते घरात

गुन्हा दाखल :- दि. २१/१०/२०२३ रोजी १७ / ४६ वा.

फिर्यादी :- योगेश शिवाजी आपुणे वय ३३ वर्षे धंदा खाजगी नोकरी रा. सी/ ओ म्हेत्रे यांची रुम, विर हॉस्पीटल शेजारी, तापकिर चौक, काळेवाडी, पुणे

आरोपी :- १) गोपाळ लिंबराव शिंदे वय अंदाजे ५५ वर्षे,२)महिला आरोपी , वय अंदाजे ५० वर्षे
३)अनिल गोपाळ शिंदे, वय २५ अंदाजे , ४)अक्षय गोपाळ शिंदे, वय २३ वर्षे अंदाजे
५) महिला आरोपी, वय अंदाजे ३० वर्षे ६)शिवाजी राऊत, वय अंदाजे ३४ वर्षे सर्व रा. लोणी काळभोर जि.पुणे
७) महिला आरोपी वय २७ वर्षे रा. तापकिर चौक, काळेवाडी, पुणे
**आरोपी क्रं ३ अटक आहे**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घरी असताना फिर्यादी व त्यांची पत्नी आरोपी क्रं ७ हिचे सोबत घरगुती कारणावरुन भांडण होत असलेने त्यांनी सदरची बाब फिर्यादीने सासु व सासरे आरोपी क्रं १ व २ यांना सांगितली होती तसेच फिर्यादीची पत्नी आरोपी क्रं ७ हिचे बाबाजी शेख रा. मोहोळ याचेशी फिर्यादीवर जादुटोणा करण्याचे इरादयाने तसेच त्यांचे जेवणात नखे व इतर काही तरी वस्तु खायला देण्याबाबत चर्चा करत असलेच्या फिर्यादीला त्यांची पत्नी आरोपी क्रं ७ चे मोबाईलमधुन रेकॉर्डींग मिळाल्या आहेत. असे फिर्यादीने सदर बाबत आरोपी क्रं १ व २ (सासु,सासरे) यांना सांगितले असता फिर्यादीला मारहाण करण्याचे इरादयाने वरिल सर्व आरोपीतांनी संगनमत करुन व बेकादेशीर जमाव जमवुन फिर्यादीवर अघोरी जादुटोण्याचा प्रयोग करुन फिर्यादीला नखे खाऊ घालणे, त्यांना त्रास होण्याचे इरादयाने मायाजाळ नावाची वस्तु व इतर वस्तु पाण्यात मिक्स करुन खायला देणे असे प्रकार केले होते सदरची बाब फिर्यादीने त्यांचे सासु सासरे यांना सांगितलेने आरोपी क्रं १ याने फिर्यादीचे घरी रात्री उशीरा येऊन फिर्यादी यांना लाकडी दांडक्याने मारले व मेहुणा आरोपी क्रं ४ याने त्याचेकडील लोखंडी कोयत्याने फिर्यादीचे डोक्यावर मारुन गंभीर जखमी केले. त्यानंतर फिर्यादीचे साडु आरोपी क्रं ६ याने फिर्यादीला त्याचेकडील लाकडी दांडक्याने मारले. तसेच फिर्यादीची सासु आरोपी क्रं २ हिने फिर्यादीच्या डोळयात चटणी टाकली. फिर्यादीची पत्नी आरोपी क्रं ७ हिने फिर्यादीचे हात धरुन ठेवले व सर्वांनी फिर्यादीला मारहाण करुन गंभीर जखमी केले. तसेच तु आता जिथे दिसशील तेथे तुला आम्ही जिवे ठार मारुन टाकु. अशी धमकी दिली. तसेच पत्नी आरोपी क्रं ७ हिने फिर्यादीस ''तुम्ही जर आमचे विरुध्द पोलीस केस केली, ती मी आत्महत्या करीन'' अशी धमकी दिली. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- आर. एम. मासाळ, पोलीस उपनिरीक्षक, ७२७६०८७१७०

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी ५५४ /२०२३ भा.दं.वि.कलम ३२६,३२४,२८९,३२३,५०४,५०६, प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१२/१०/२०२३ रोजी सकाळी ०७/३० वा सुमारास शिवचैतन्य निवास समोर त्रिमर्ती कॉलनी,देवकर पथ,कवडे नगर पिंपळे गुरव पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१ /१०/२०२३ रोजी २३/ ४८वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | महिला आरोपी ,**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी या घरासमोर झाडु मारीत असताना आरोपी महिला यांचे पाळीव कुत्र्याने फिर्यादीचे राहते घरासमोर शी केल्याने फिर्यादी यांनी त्याचा जाब विचारला असता आरोपी महिलेला त्याचा राग आल्याने तिने फिर्यादीस गंभीर दुखापत करण्याच्या उददेशाने तिच्या पाळीव कुत्र्याला छु म्हणुन तिच्या हातातील कुत्र्याची दोरी जाणीवपुर्वक सोडुन देवुन कुत्र्याला फिर्यादीचे अंगावर उददेशपुर्वक व जाणिवपुर्वक सोडल्याने तिच्या कुत्र्याने फिर्यादीचे उजव्या पायाचे मांडीला चावा घेवुन मांडीचा लचका तोडुन फिर्यादीला गंभीर जखमी केले त्यावेळी फिर्यादी जोरात आरडा-ओरडा करुन जमिनीवर पडले त्यांनतर कुत्रा बाजुला झाल्यानंतर आरोपी महिलेने फिर्यादीस लाथा बुक्याने मारहाण करुन फिर्यादीस गंभीर दुखापत करण्याच्या उददेशाने व जाणीवपुर्वक तिच्या हातामधील लोखंडी कठिण वस्तुने फिर्यादीचे उजव्या मांडीवर मारुन जखमी केले व ‘‘तुमच्या कुटुंबाला कुठल्या गुन्हयात अडकवेन ते बघा व तुम्हाला सोडणार नाही, मग तुम्ही माझ्या नादाला पण कधी लागणार नाही,तुमची माझ्याशी गाठ आहे’’,अशी धमकी दिली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोलीस उप-निरी गावांडे सो मो.नं९०२८०४३३२६ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ११९९/२३ भादवि कलम ४२०,४०६ आयटी ॲक्ट २००० चे कलम ६६(सी), ६६(डी) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१५/०२/२०२३ ते दि. २८/०४/२०२३ चे दरम्यान ऑनलाईन ट्रेडींच्या माध्यमातुन |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/१०/२०२३ रोजी २०/२५ वा. |
| फिर्यादी | :- | अमोल विद्याधर माजगावकर, वय ३७ वर्षे, धंदा नोकरी रा. फ्लॅट नं. ७०१, जीवन ए बिल्डींग यास्वीन जीवन ॲन्ड ऑचिड सोसायटी सुसगाव ता. मुळशी जि. पुणे |
| आरोपी | :- | +601128247796,+601127059182,+60116235634 या व्हॉट्स ॲप मोबा नंबर वरुन (अज्ञात इसम ) |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील मोबाईल धारक वरील अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीस ऑनलाईन ट्रेडिंग करण्यासाठी २,००,०००/- रु. गुंतवणुक करायला लावले व मिळालेले प्रॉफिट काढण्यासाठी म्हणुन एकुन ९,००,०००/- रु. पाठविण्यास सांगुन तक्रादार यांची दिशाभुल करुन एकुन ११,००,०००/-(अकरा लाख) रु इतकी रक्कमेची ऑनलाईन पध्दतीने फसवणुक केली आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | श्री किशन कांदे,पोलीस उप-निरीक्षक ९५५२५५१८६६ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी १०५२/२३ भा.दं.वि कलम ४२०,४०६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१३/०६/२०२३ ते १३/०८/२०२३ रोजीचे दरम्यान ऑफिस न. ३१६, रामा इक्वाटर, मोरवाडी, पिंपरी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि. २१/१०/२०२३ रोजी २१.१५ वा |
| फिर्यादी | :- | अभिमन्यु ताराकांत चौधरी वय- ४८ वर्षे, धंदा- नोकरी, रा. फ्लॅट नं- ९०६, मंगलधारा को-ऑप.हौसंग सोसायटी, बास्केट ब्रिजजवळ, रावेत, |
| आरोपी | :- | विशाल प्रकाश बागड वय- ४० वर्षे, ऑफिस न. ३१६, रामा इक्वाटर, मोरवाडी, पिंपरी पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व फिर्यादीची पत्नी असे जागा खरेदी करण्यासाठी शोधत असताना फिर्यादीचे पत्नीने मोबाईलवर आरोपी हे प्रोप्रायटर असलेले फर्स्टी रिएल्टर्स या पिनॅकल पार्क, कुसगाव खुर्द, कामशेत ता. मावळ, जि. पुणे येथिल बंगलो प्लॉटची जाहीरात पाहीली व ते आरोपीचे मोरवाडी पिंपरी येथिल ऑफिसवर गेल्यावर आरोपीने फिर्यादी व त्याचे पत्नीला कुसगाव जमीन गट नं. २८५ मधील पलॉटचे प्रोजेक्टची जाहीरात, नकाशा जमीनीचा सात बारा, जमीन मालक यांच्याशी झालेल्या व्यवहाराची कागदपत्रे व सदर ठिकाणचे प्लॉट नं. ३८,३९,४०,४१ दाखवुन सदर चार गुंठे जागा प्रत्येकी सहा लाख गुंठा असा दर ठरवुन फिर्यादीकडुन ऑनलाईन एकुण रक्कम ४,४८,०००/- रु. (चार लाख अठ्ठेचाळीस हजार) घेतले व फिर्यादीस नोटराईस विसार पावती लिहुन दिली व प्रत्यक्षात सदर जागेचे खरेदी खत करुन न देता सदरचे त्याचे कार्यालय बंद करुन निघुन गेला व फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | शितल गिरी, पोलीस उप-निरीक्षक, ८४४६७१४०३५ |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ५४७/२०२३ भा.द.वि.कलम ,१७०,४१९,४२०,प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२१/१०/२०२३ रोजी सकाळी ०७/३० वा.चे सुमारास बॅक ऑफ महाराष्ट्रा समोरील रोडवर,गवत बाजार,हरणेश्वरवाडी तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/१०/२०२३ रोजी वेळ १८/१९ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | दोन अनोळखी इसम |
| तपशिल | :- | नमुद तारेखस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी या पायी चालत जात असताना फिर्यादीचे पाठीमागुन एका दुचाकीवरील अनोळखी इसम फिर्यादीचे जवळ येवुन थांबला व फिर्यादीस म्हणाला की मी पोलीस डिपार्टमेंन्टचा माणुस आहे. मला लोकांचे सोने चांदीचे दागिने चोरी जातात त्याचा तपास करण्यासाठी पाठविले आहे. असे सांगुन आरोपीने फिर्यादी यांना त्यांचे कानातील कुडया, गळयातील मण्याचे गंठण एकुण ५४,०००/- रू किमतीचे दागिने तुम्हाला कागदात बांधुन देतो असे बोलला. फिर्यादीने त्यास दागिने काढुन दिले.ते दागिने आरोपीने एका कागदात बांधुन हे जपुन ठेवा असे सांगुन तेथुन सदर इसम दुचाकीवरुन जाताना त्याचा दुसरा मित्र बाजुला थांबलेला त्यास दुचाकीवर बसुन निघुन गेला. फिर्यादीने सदरचा कागद उघडुन पाहिला असता अज्ञात आरोपी याने हातचालाकी करुन सोन्याचे दागिने घेवुन फिर्यादींना दगड देवुन त्यांची फसवणुक केली आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मुल्ला ९४०३०७१५७८ |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ८५९/२०२३ भा.द.वी.का. कलम.४०९,४६४,४६५,४७७(अ),५११ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. २१/०९/२०२३ रोजी ११.०० ते २७/०९/२०२३ रोजी १७.०० वा. पावेतो, दि.संगमनेर मर्चंटस को-ऑप- बँक लि. शाखा चाकण |
| गुन्हा दाखल | :- | दि. २१/१०/२०२३ रोजी २३/१४ वा |
| फिर्यादी | :- | प्रकाश अरूण बोंबले वय ३७ वर्षे, दि.संगमनेर मर्चंट्स को-ऑप. बँक लि., शाखा आळेफाटा नंदनवन साईट ता.जुन्नर जि.पुणे. |
| आरोपी | :- | १.श्री. विजय भगवान अडसुळ वय ४८ वर्ष, शाखा अधिकारी, दि.संगमनेर मर्चंटस को-ऑप- बँक लि. शाखा चाकण. रा. माळ नं.-५९/४/२३६, हनुमान कॉलनी, अडसुळ चाळ, आळंदी रोड जय महाराष्ट्र चौक, भोसरी, पुणे. **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी वरील आरोपी मजकुर यांनी दि.संगमनेर मर्चंटस को-ऑप- बँक लि. शाखा चाकण येथे शाखा अधिकारी पदावर असताना अधिकाराचा गैरवापर करून स्वाताःच्या फायदयासाठी पदाचा गैरवापर करून बोगस ग्राहक पंचरास रंगनाथ रामचंद्र यांचे नावे खोटा दस्तऐवज बनावटीकरण करुन जाणुन बुजुन खोटे मुल्यवान रोख बनवुन कर्ज प्रकरणे मंजुर करून बँकेच्या रकमेचा अपहार करण्याचा प्रयत्न केला. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मडके पो.उप नि ९८५०२२९३१६ |

०९

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड १०३९/२३, भा.द.वि.कलम ३४१,२८३,३४ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(३) सह १३५, ३३(१) सह १३१ व १०२ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. २१/१०/२०२३ रोजी २०.५० ते २२.०० वा. चे सुमारास दुहेरी वाहतुक असलेला वाकड रोडमधील वाकड ते डांगेचौकाकडे जाणारे रोडवर, मंगलनगर समोर, थेरगांव, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/१०/२०२३ रोजी २३/१२ वा. |
| फिर्यादी | :- | सचिन नामदेव सुतार, पोलीस हवालदार ब.नं.१४७०, वाकड पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड आयुक्तालय. |
| आरोपी | :- | न्यु आझाद युवक संघ, ॲड. सचिनभाऊ भोसले युवामंच चे अध्यक्ष ॲड. सचिन सुरेश भोसले व मंडळाचे पदाधिकारी **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद केले तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी विनापरवाना स्टेज लावुन ह.भ.प.सो सुप्रियाताई साठे ठाकुर (ठाकुर पिंपरी चाकण) यांचे किर्तन हा कार्यक्रम हा घेवुन आयुक्तालय हद्दीत लागु असलेल्या मनाई आदेशाचा भंग करुन लोकांची गर्दी जमवली व सदरचा रोड बंद करुन लोकांना जाण्यास अडथळा निर्माण केला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | संभाजी जाधव, सहा.पोलीस निरीक्षक ९६५३३०६१५६ |